**ठळक बातम्या**

- लोक-सहभागाच्या बळावर मोठमोठ्या संकटांचा सामना करता येऊ शकतो हे आणीबाणीच्या काळानं दाखवून दिल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी विषय शिकवण्यासंदर्भात काढलेले दोन्ही शासन निर्णय रद्द /त्रिभाषा सूत्राबाबत समिती स्थापन करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

- राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होणार, सरकारच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार

- ओदिशामध्ये पुरी इथं जगन्नाथ यात्रेदरम्यान चेंगराचेंगरी होऊन तीन भाविकांचा मृत्यू , १२ जण जखमी /दुर्घटनेच्या उचस्तरीय चौकशीचे आदेश

**आणि**

- अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत महिला गटात तन्वी शर्मा आणि पुरुष गटात आयुष शेट्टी यांच्या आज विजेतेपदांसाठी लढती

**<><><><><>**

लोक-सहभागाच्या ताकदीच्या बळावर मोठमोठ्या संकटांचा सामना करता येऊ शकतो हे आणीबाणीच्या काळानं दाखवून दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे तेविसाव्या भागात आज ते बोलत होते. आणीबाणी लादण्याच्या घटनेला पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त, देशात संविधान हत्या दिवस पाळला गेला त्याबद्दल ते बोलत होते. यासंदर्भात मोरारजी देसाई आणि अटल बिहारी वाजपेयी या माजी प्रधानमंत्र्यांनी आणीबाणीच्या निषेधात केलेल्या भाषणांचा अंश ही त्यांनी श्रोत्यांना ऐकवला.

आणीबाणीच्या काळात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करत, समाजातल्या प्रत्येक घटकाला त्रास दिला गेला. मात्र भारताच्या जनतेनं न झुकता आपलं सामर्थ्य दाखवलं, आणीबाणी हटली आणि आणीबाणी लादणारे पराभूत झाले असं ते म्हणाले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त यावर्षी विशाखापट्टणम इथं झालेल्या मुख्य कार्यक्रमासह, देश आणि परदेशात विविध ठिकाणी झालेल्या अभिनव उपक्रमांचा तसंच त्यातल्या अभूतपूर्व लोकसहभागाचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. जगातल्या मोठमोठ्या शहरांमधे झालेल्या योग दिन सोहळ्याच्या छायाचित्रांमध्ये शांतता, स्थैर्य आणि संतुलनाचं दर्शन घडल्याचं मत त्यांनी मांडलं.

**होल्ड बाईट - MKB YOG MAHATWA**

नुकत्याच झालेल्या जागतिक पर्यावरण दिनाविषयी बोलताना त्यांनी देशभरात केल्या जात असलेल्या अनुकरणीय प्रयत्नांचा उल्लेख केला. पुण्याचे रमेश खरमाळे वन संवर्धनासाठी करत असलेल्या कार्याची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. मन की बात मधे आपल्या कार्याचा उल्लेख झाल्याबद्दल रमेश खरमाळे यांनी आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या.

**होल्ड बाईट - रमेश खरमाळे**

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातल्या पाटोदा ग्रामपंचायतीनं सामूहिक प्रयत्नातून कार्बन तटस्थता गाठल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. लहानसहान सवयींमधून जेव्हा सामूहिक निर्धार उभा राहतो तेव्हा निश्चितपणे फार मोठं परिवर्तन घडून येतं असं ते म्हणाले.

एक पेड, माँ के नाम  या अभियानात सहभागी होण्याचं आणि भावी पिढ्याचं भविष्य सुरक्षित करण्याचं त्यांनी आवाहन श्रोत्यांना केलं.

जागतिक आरोग्य संघटनेनं भारत हा ट्रॅकोमा या डोळ्यांच्या आजारापासून मुक्त झाल्याची घोषणा  केली असल्याची माहिती त्यांनी दिली. भारत आरोग्यापासून

ते सामाजिक सुरक्षा पर्यंत प्रत्येक क्षेत्रात देश परिपूर्णतेच्या भावनेनं पुढे जात असल्याचं ते म्हणाले. देशातल्या ६४ टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्येला आता सामाजिक सुरक्षा विषयक योजनांचा लाभ मिळत असल्याचं आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अलिकडच्या अहवालात म्हटलं आहे, अशी माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. २०१५ पर्यंत सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी २५ कोटींपेक्षा कमी होते. ते आता ९५ कोटी झाले आहेत, असं ते म्हणाले.

महिलांच्या नेतृत्वाखाली विकास या मंत्राच्या आधारे भारत आपलं नवं भविष्य उभारत असल्याचं ते म्हणाले. यानिमित्तानं त्यांनी देशभरातली महिला उद्योजकतेची प्रेरणादायी उदाहरणं श्रोत्यांसमोर मांडली.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात उतरलेले पहिले भारतीय ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्यासोबत झालेल्या संवादाविषयी देखील ते बोलले.

<><><><>

राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी विषय शिकवण्यासंदर्भात काढलेले दोन्ही शासन निर्णय रद्द करत असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापानानंतर ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. शालेय शिक्षणात तिसरी भाषा कधीपासून शिकवावी, ती कोणती असावी, कशी शिकवली जावी, यासंदर्भात शिफारशी करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात समिती स्थापन करण्याची घोषणाही त्यांनी केली. या समितीनं अहवाल सादर केल्यानंतर त्यानुसार पुढचा निर्णय घेऊ, असं ते म्हणाले.

<><><><>

मराठी माणसाची शक्ती सरकारच्या सत्तीला हरवू शकते, हे त्रिभाषा धोरणासंदर्भातल्या सरकारच्या निर्णयावरून स्पष्ट होतं, असं प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी आज वार्ताहर परिषदेत केलं.

यासंदर्भात सरकारनं नेमलेल्या समितीला काहीही अर्थ नाही. कोणतीही समिती नेमली, तरी हिंदीची सक्ती करू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होत आहे. येत्या १८ जुलैपर्यंत हे अधिवेशन चालणार आहे. अधिवेशनच्या पूर्वसंध्येला आज सरकारनं आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधी महाविकास आघाडीनं बहिष्कार टाकला. भ्रष्टाचार, मराठीवर अन्याय, हिंदीची सक्ती, शक्तिपीठ महामार्गाला विरोध इत्यादी मुद्द्यांवर राज्य सरकार पूर्णपणे अपयशी ठरलं असल्याची टीका महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केली.

**<><><><><>**

राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी विषय शिकवण्यासंदर्भातल्या शासन निर्णयाच्या निषेधार्थ आज राज्यभरात विविध ठिकाणी विविध पक्षसंघटनांनी या शासन निर्णयाची होळी केली. त्रिभाषा सूत्र राज्यात लागू न करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, मनसे, काँग्रेस, माकप, भाकप, वंचित बहुजन आघाडी या पक्षांसह अनेक संस्था सहभागी झाल्या होत्या.

**<><><><><>**

ओदिशामध्ये पुरी इथे आज सकाळी भगवान जगन्नाथाच्या यात्रेवेळी चेंगराचेंगरी होऊन तीन भाविकांचा मृत्यू झाला आणि १२हून अधिक जण जखमी झाले. जगन्नाथ मंदिर परिसरातल्या गुंडिचा मंदिर इथे आज पहाटे भगवान जगन्नाथ, बलभद्र आणि सुभद्रा यांच्या दर्शनासाठी मोठी गर्दी जमलेली असताना ही दुर्घटना झाली. जखमींना रुग्णालयात दाखल केलं असून त्यापैकी सहा जणांची प्रकृती गंभीर आहे.

ओदिशा राज्य सरकारनं मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २५ लाख रुपयांच्या मदतीची घोषणा केली आहे. तसंच पुरीचे जिल्हा दंडाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांची बदली करण्यात आहे आणि घटनेची उचस्तरीय प्रशासकीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष गटात आयुष शेट्टीनं जागतिक मानांकनात सहाव्या क्रमांकावरचा चोऊ तिएनचेन याला २१-२३, २१-१५, २१-१४ असं हरवून अंतिम फेरी गाठली आहे. विजेतेपदासाठी आज रात्री त्याची लढत तृतीय मानांकित कॅनेडियन खेळाडू ब्रायन यांगशी होणार आहे..

महिला एकेरीत तन्वी शर्माने उपान्त्य फेरीत काल युक्रेनच्या पोलिना बुरहोवाचा २१-१४, २१-१६ असा पराभव केला. आता तिचा सामना चीनच्या बेईवेन झांग बरोबर होत आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसामुळे नद्या नाले दुथडी भरुन वाहत आहेत. चारधाम यात्रेकरुंना हरिद्वार, ऋषिकेश, श्रीनगर, रुद्रप्रयाग, सोनप्रयाग आणि विकासनगर इथं थांबवण्याच्या सूचना पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. राज्यात २ जुलैपर्यंत पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता हवामानखात्याने वर्तवली आहे. डेहराडून, टिहरी, हरीद्वार इत्यादी भागांमध्ये उद्या पावसाचा रेड अलर्ट दिला आहे. हवामानाच्या स्थितीत सुधारणा होईपर्यंत चारधाम यात्रा स्थगित राहील, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**//<><><><><>//**